



दैनिक **मराठवाडा पत्र**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २२३ ●बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955





# राज्य मंत्रिमंडळ बैठकीत ५ मोठे निर्णय

## ५ व्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवला

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, ५ व्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीचा कालावधी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज कॅबिनेटची मंत्रिमंडळ बैठक संपन्न झाली. त्यामध्ये, ५ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सहकारी, विधि व न्याय, वित्त विभाग आणि जलसंपदा विभागासाठी २ असे एकूण ५ निर्णय घेण्यात आले.

मंत्रालयातील आजच्या बैठकीतील मंत्रिमंडळ निर्णय




### ● भीमाशंकरसह विविध तीर्थक्षेत्र संदर्भाने बैठक

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबई येथे पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथ व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर या ज्योतिर्लिंगांच्या विकासासंदर्भात सादरीकरण बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील भाविक नियमितपणे ज्योतिर्लिंगांच्या दर्शनासाठी येतात, हे लक्षात घेऊन श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगांचा सर्वसमावेशक विकास आराखडा असावा. मंदिर परिसरात सुरू असलेली विकासकामे गतीने पूर्ण करून प्रस्तावित कामांचे योग्य नियोजन करा. या परिसरात भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी अत्याधुनिक एकात्मिक सुरक्षाप्रणाली कार्यरत करून भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा सुविधा तयार करण्यासाठी गतीने कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

(सहकार विभाग)- नाशिक, नागपूर व धाराशिव या जिल्हा मध्यवती सहकारी बँकांना ८२७ कोटी रुपयांचे शासकीय भागभांडवल

(विधि व न्याय विभाग)- न्यायालयीन संकुले तसेच न्यायाधिशांची निवासस्थाने यांच्या सुरक्षेत वाढ. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांच्याकडून अतिरिक्त ▶

# आ. संदीप क्षीरसागर यांच्या गोटात मोठी फूट

## अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून सतीश शेळकेंसह शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या उंबरठ्यावर बीडच्या राजकारणात जबरदस्त उलथापालथ झाली असून बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● शिवसेना हा मालक-नोकरांचा नाही, कार्यकर्त्यांचा पक्ष- उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे

**शिवसेनेवर विश्वास ठेवून आपण आलात. आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. अवघ्या महाराष्ट्राला माहिती आहे, एकनाथ शिंदे दिलेला शब्द म्हणजे पाळलेलं वचन आहे. आपण सर्वजण तळागाळातील शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य माणसांच्या आयुष्यात सुखाचे दिवस आणण्यासाठी शिवसेनेत आलात. शिवसेना हा मालक-नोकरांचा नाही, कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. आपलं सर्वांचं शिवसेनेत मनापासून स्वागत करतो आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.'' असे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब प्रवेश सोहळ्या दरम्यान म्हणाले.**

# भाजपचं मुख्यमंत्रीपदाचं स्वप्न भंगणार? नितीश कुमार यांच्या जेडीयूचा वारू उधळला, एक्झिट पोलनुसार सर्वाधिक जागा मिळणार

**वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. आज दुसऱ्या टप्प्यातील मतदान संपल्यानंतर एक्झिट पोल समोर आले आहेत. यातील बहुतांशी टीव्ही चॅनेल आणि एजन्सींनी बिहारमध्ये एनडीएचे सरकार येण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे महाआघाडीला मोठा धक्का बसला आहे. आता लोक १४ नोव्हेंबरला जाहीर होणाऱ्या निकालांची प्रतिक्षा करत आहेत. एक्झिट पोलनंतर आता बिहारचा मुख्यमंत्री कोण होणार असा प्रश्नही उपस्थित होत आहे. याबाबत सविस्तर



माहिती जाणून घेऊयात.

जेडीयूला सर्वाधिक जागा मिळण्याचा अंदाज- बिहार विधानसभेच्या निकालाबाबत मॅट्रिज-आयएएनएस आणि चाणक्य यांनी एक्झिट पोल सादर केले आहेत. मॅट्रिज-आयएएनएसने जेडीयूला ६७ ते ७५ आणि भाजपला ६५ ते ७३ जागा मिळण्याची शक्यता वर्तवली आहे. चाणक्यच्या पोलमध्ये भाजपला ७० ते ७५ आणि जेडीयूला ५२ ते ५७ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

जेडीयूचं पारडं जड- एनडीएला बहुमत मिळाल्यास जेडीयू आणि भाजप यांच्यात मुख्यमंत्रीपदासाठी रस्सीखेच पहायला मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राप्रमाणे बिहारमध्येही भाजपला मुख्यमंत्री पदाची खुर्ची हवी आहे, यासाठी भाजपने कंबर कसली आहे. मात्र नितीश कुमार यांच्या पक्षाला जास्त जागा मिळण्याचा अंदाज असल्याने ते मुख्यमंत्री ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● बिहारचा मुख्यमंत्री कोण होणार ?

**मॅट्रिझ आएएनएस संस्थेच्या एक्झिट पोलनुसार बिहारचे विद्यामान मुख्यमंत्री नितीश कुमार याचा जेडीयू हा पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरण्याची शक्यता आहे. त्यानंतर भाजपा हा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरण्याची शक्यता आहे. आरजेडी पक्ष तिसऱ्या क्रमांकावर राहण्याची शक्यता आहे. या पक्षाला एकूण ५३ ते ५८ जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता बिहारमध्ये मुख्यमंत्री कोण होणार हा प्रश्न उपस्थित होत आहे.**

# दिल्ली बॉम्बस्फोटानंतर राज्यभरात अलर्ट, मुंबई पुण्यासह नागपुरातील संघ मुख्यालयाच्या सुरक्षेत वाढ; पोलिसांचा चोख बंदोबस्त

**मुंबई । प्रतिनिधी**

देशाची राजधानी दिल्ली काल (१० नोव्हेंबर) झालेल्या स्फोटाने हादरून गेलीय. ऐतिहासिक लाल किल्ल्याजवळील मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ च्या परिसरातून जाणाऱ्या एका कारमध्ये सोमवारी सायंकाळी सुमारे ६.५२ वाजता भीषण स्फोट झाला. या स्फोटात आतापर्यंत ▶ उर्वरित पान २ वर



# राष्ट्रवादी नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांच्यावर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेकायदेशीर जमाव जमवल्याप्रकरणी प्रकरणी हा गुन्हा दाखल झाला आहे. बहिणीवर दाखल झालेल्या गुन्ह्याचा जाब विचारण्यासाठी रुपाली ठोंबरे खडक पोलिस ठाण्यात गेल्या होत्या. यावेळी त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्यासोबत अरेरावी करण्याचा प्रयत्न केला होता. यानंतर पोलिसांनी रूपाली पाटील ठोंबरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. रुपाली पाटील यांची बहीण आणि इतर तीन जणावर खडक पोलीस ठाण्यात गुन्हा ▶▶ उर्वरित पान २ वर

# भावा विरोधात विधानसभेला काम करणारे हेमंत क्षीरसागर भाजपात काय दिवे लावणार ?




**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत संदीप क्षीरसागर यांनी एकाकी लढा दिला. त्यात विजय देखील मिळवला. मात्र त्यांचे सख्खे भाऊ हेमंत क्षीसागर यांनी त्यांच्यापासून चार हात लांब रहात चुलत भाऊ योगेश क्षीरसागर यांना मदत केली. त्यात त्यांना पराभव स्वीकारावा लागला.हेच हेमंत क्षीरसागर आता भाजपमध्ये जाऊन काय दिवे लावणार? असा प्रश्न राजकीय ▶▶ उर्वरित पान २ वर

# सर्वसामान्य लोकांची कामे करायचीत असा निर्धार करून निवडणुकीला सामोरे जा: आ.संदीप क्षीरसागर

## नगरपालिकेच्या अनुषंगाने आ.क्षीरसागरांनी घेतली पदाधिकारी, कार्यकर्त्यांची आढावा बैठक

**बीड । प्रतिनिधी**

सर्वसामान्य लोकांची कामे करण्यासाठीच आपण निवडणूक लढत आहोत. शहरातील नागरिकांचे अनेक मूलभूत प्रश्न प्रलंबित आहेत. त्यावर आपल्याला काम करायचे आहे. निवडून आल्यानंतरही आपल्याला



लोकांची कामे करायचे आहेत, असा निर्धार करून निवडणुकीला सामोरे जा. आपल्या पक्षाच्या पुरोगामी विचारधारेनुसार आपल्याला काम करायचे. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी आपले पदाधिकारी व कार्यकर्ते यांना सांगितले. मंगळवारी (दि.११) रोजी नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी बैठक बोलावली होती. यावेळी संवाद साधताना ते बोलत होते.


नगरपालिका निवडणूक प्रक्रिया चालू झाली आहे. या निवडणुकीतील रणनीती आखण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.११) रोजी राष्ट्रवादी भवन बीड, येथे आपले पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची बैठक घेतली. या बैठकीत सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवार यांनी आपापली मते मांडली. दरम्यान हि बैठक केवळ ▶▶ उर्वरित पान २ वर



*रुद्रांश ज्ञानेश्वर शिंदे याला ३ ऱ्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना आई 'पपा श्रद्धा ज्ञानेश्वर शिंदे. छायाचित्रात दिसत आहेत.*

## १५ जणांनाही आवरला नाही, कोल्हापूरच्या बिबट्याचा ३ तास थरार ; अथक प्रयत्नानंतर बिबट्याला पकडण्यात यश







वेळ सकाळी अकरा वाजताची.. कोल्हापूर शहरातील मध्यवस्तीत असणाऱ्या विवेकानंद कॉलेज परिसरात बिबट्या दिसला अशी अफवा पसरली. पण साडेअकरा वाजता हॉटेल वुडलैंड परिसरात बिबट्यानं हॉटेलमधील माळी काम करणाऱ्या व्यक्तीवर हल्ला केला. यानंतर बिबट्या दिसला ही अफवा नसून बिबट्या खरंच शहरात घुसल्याची बातमीची खात्री झाली. त्यानंतर कोल्हापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन टीम, वन विभाग ▶▶ उर्वरित पान २ वर



# सार्वजनिक सेवा प्रसारण : लोकशाहीतील संवादाचे हृदयस्पंदन

भारताचा स्वातंत्र्योत्तर प्रवास हा केवळ राजकीय, आर्थिक किंवा सामाजिक परिवर्तनाचा इतिहास नाही, तर तो संवादाच्या विकासाचीही एक अद्वितीय कथा आहे. समाजाच्या प्रत्येक स्तरातील, प्रत्येक घटकापर्यंत, कोणत्याही भेदभावाशिवाय माहिती, ज्ञान, संस्कृती, तत्त्वप्रणाली आणि राष्ट्रीय भावनेचा प्रकाश पोहचावा ही लोकशाहीची मूलभूत अपेक्षा आहे. या अपेक्षेला साकारण्याचे महान कार्य आपल्या देशातील सार्वजनिक सेवा प्रसारण संस्थांनी म्हणजेच विशेषतः आकाशवाणी (All India Radio) आणि दूरदर्शन (Doordarshan) यांनी अखंड आणि निष्ठेने पार पाडले आहे. म्हणूनच दरवर्षी १२ नोव्हेंबर हा दिवस "राष्ट्रीय सार्वजनिक सेवा प्रसारण दिन" म्हणून साजरा केला जातो. १२ नोव्हेंबर १९४७ रोजी महात्मा गांधी यांनी दिल्लीच्या आकाशवाणी केंद्रातून पहिल्यांदा स्थलांतरित शिबिरातील विस्थापितांशी थेट संवाद साधला, त्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

सार्वजनिक सेवा प्रसारण ही केवळ माहितीपुरवठ्याची प्रक्रिया नाही. ती राज्य, समाज आणि नागरिक यांच्यातील बंध अधिक घट्ट करणारी एक सांस्कृतिक-सामाजिक साखळी आहे. लोकशाही समाजात माध्यमे नागरिकांना फक्त मनोरंजन देण्यासाठी नसतात; ती जनजागृती, सशक्तीकरण, शिक्षण, जागरूकता, समता आणि सामाजिक एकात्मतेच्या निर्मितीत सक्रिय भूमिका बजावत असतात. सार्वजनिक सेवा प्रसारणाचे मूळ तत्त्व म्हणजे निरपेक्षता, सार्वजनिक हित, समतोल प्रतिनिधित्व आणि वस्तुनिष्ठता. या मूल्यांच्या अनुषंगाने भारतातील प्रजासत्ताक प्रवासाला आकाशवाणी आणि दूरदर्शन यांनी अनन्यसाधारण योगदान दिले आहे.

भारतीय समाज विविधतेने समृद्ध आहे. विविध भाषा, जाती, धर्म, भौगोलिक प्रदेश, परंपरा, आर्थिक स्तर यांचा व्यापक पट आपल्याला दिसतो. अशा विविधतेने नटलेल्या समाजात सामूहिक ओळख आणि एकात्मता निर्माण करणे ही अत्यंत नाजूक जबाबदारी आहे. व्यापारी स्वार्थावर आधारित खाजगी माध्यमे बहुधा लोकप्रियता, बाजारपेठ आणि नफा यांना अग्रक्रम देतात; परंतु सार्वजनिक सेवा प्रसारणाचे कार्य म्हणजे समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत सत्य आणि उपयुक्त माहिती पोचवणे होय. भारतातील ग्रामविकास, आरोग्य, प्राथमिक शिक्षण, कृषीशेती, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संरक्षण, विज्ञान लोकप्रियीकरण, संविधानिक मूल्यांची जागृती इत्यादी क्षेत्रांमध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शन यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे.

विशेषतः ग्रामीण भारतासाठी सार्वजनिक सेवा प्रसारण हे ज्ञानाचे विद्यापीठच ठरले आहे. गावागावातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती, हवामान अंदाज, बियाण्यांची निवड, पीकसंरक्षण, सरकारी योजना, बाजारभाव याविषयी मार्गदर्शन थेट त्यांच्या भाषेत आणि सोप्या पद्धतीने देणारे माध्यम म्हणजे आकाशवाणी होय. अनेक दशकांपासून भारतातील शेतकरी 'कृषीवार्ता' ऐकून आपला कृषी आराखडा आखत आला आहे. पाणीटंचाई, दुष्काळ, कीड, आपत्ती अशा संकटकाळातही सार्वजनिक सेवा प्रसारणाने माहितीपुरवठा बंद केला नाही तर तो अधिक वाढवलाआहे, हीच त्याची सामाजिक बांधिलकी आहे.

दूरदर्शनसुद्धा भारतीय समाजासाठी सांस्कृतिक-सामाजिक दुवा राहिले आहे. एककाळी 'छोटा पडदा' हा भारतीय घरांमध्ये ज्ञान, नैतिक मूल्ये, परिवारात्मक संबंध, साहित्यिक संस्कार आणि राष्ट्रीय भावनेचा वाहक ठरला. भारत एक खोज, अरबियन नाईट्स, मालगुडी डेज, ब्योमकेश बक्षी, चक धूम धूम अशा धारावाहिकांनी भारतीय मनावर चिरंतन छाप सोडली. आज डिजिटल युगात माहितीचे स्त्रोत अधिक झाले असले तरी गुण, प्रामाणिकता, तथ्य, समतोल आणि संस्कार जपणाऱ्या माध्यमांची गरज अधिकच वाढली आहे. कारण व्यापारी माध्यमांमध्ये माहितीची स्पर्धा इतकी वाढली आहे की सत्य विकृत होण्याचा धोका अधोरेखित होतो.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, माध्यमे ही केवळ माहितीपुरवठ्याचे साधन नसून सामाजिकरणाचे (Socialization) प्रमुख घटक आहेत. व्यक्तीला समाजातील आदर्श, मूल्य, परंपरा आणि भूमिका समजण्यास माध्यमांची मोलाची मदत होते. सार्वजनिक सेवा प्रसारण संस्थांनी या सामाजिकरण प्रक्रियेत समाजात सहिष्णुता, विविधतेचा आदर, लोकशाही मूल्य, तसेच "एकता मध्ये अनेकता" या भारतीय तत्त्वज्ञानाला आधार दिला. विशेषतः भाषिक आणि सांस्कृतिक जतनाच्या कार्यात आकाशवाणीने केलेली भूमिका अनन्यसाधारण आहे. २२ पेक्षा अधिक प्रमुख भाषांमध्ये आणि शेकडो बोलीमध्ये कार्यक्रम देणारी अशी जगात एकही संस्था नाही ही भारताची अद्वितीय सांस्कृतिक शक्ती आहे.

डिजिटल क्रांतीनंतर माध्यमविश्वात मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले. इंटरनेट, सोशल मीडिया, वेब पोर्टल्स, ओटीटी प्लॅटफॉर्म, मोबाइल ॲप्स यांनी माध्यमांना अधिक वेग आणि पोहोच दिली. पण या बदलांमुळे गैरमाहिती (misinformation), अफवा (rumors), द्वेषयुक्त प्रचार (hate propaganda), आणि ध्रुवीकरण (polarization) वाढण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर विश्वसनीय, तथ्याधिष्ठित आणि संतुलित माहितीपुरवठ्याचे महत्त्व आधीपेक्षा कितीतरी पट वाढले आहे. म्हणूनच आज सार्वजनिक सेवा प्रसारणाचे संरक्षण, बळकटीकरण आणि आधुनिकीकरण अत्यंत आवश्यक झाले आहे.

भविष्यात सार्वजनिक सेवा प्रसारण अधिक प्रभावी व्हावे यासाठी तीन गोष्टी अनिवार्य आहेतत्या म्हणजे संपादकीय स्वायत्तता, तांत्रिक आधुनिकीकरण आणि सार्वजनिक सहभाग होय. माध्यमांना राजकीय किंवा व्यापारी हस्तक्षेपापासून मुक्त ठेवणे ही खऱ्या लोकशाहीची हमी आहे. त्याचसोबत नवीन तंत्रज्ञान, डिजिटल प्लॅटफॉर्म, समुदाय रेडिओ, स्थानिक भाषिक केंद्रांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागरिकांनीही सार्वजनिक सेवा प्रसारणाचे मूल्य ओळखून त्याचा सर्जनशील वापर करणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय सार्वजनिक सेवा प्रसारण दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर लोकशाहीच्या आत्म्याला सशक्त करण्याचा संकल्प दिवस आहे. आजच्या तरुण पिढीने सार्वजनिक माध्यमे फक्त जुने किंवा मर्यादित असल्याचा गैरसमज न ठेवता, त्यांचा समाजनिर्मितीत असलेला मूलभूत वाटा समजून घ्यावा. माहितीचे युग हेच खरे ज्ञानाचे युग आहे—परंतु तेवढेच खरे की जाणिवेपेक्षा भ्रम जवळ असतो, म्हणूनच विश्वसनीय माध्यमांचे स्थान अजूनही अप्रतिस्पर्धनीय आहे.

मनुष्याच्या विचारविश्वाचे, देशाच्या लोकशाही आराखड्याचे आणि समाजाच्या सांस्कृतिक एकतेचे रक्षण करणारे माध्यम म्हणजे सार्वजनिक सेवा प्रसारण होय. म्हणूनच आपण सर्वांनी एकच प्रार्थना करावी ती म्हणजे हे सार्वजनिक सेवा प्रसारण माध्यम केवळ आवाज नसावे, तर समाजाच्या अंतःकरणाचा स्पंदन राखणारा श्वास असावा.'लोकशाहीला माहितीचा दीप हवा आहे, आणि त्या दीपाचे नाव आहे, सार्वजनिक सेवा प्रसारण.'

- डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान 9 वरून पुढे...

## राज्य मंत्रिमंडळ...

सुरक्षारक्षक उपलब्ध करून घेण्यास व त्याकरिता खर्च तरतुदीस मान्यता. (वित्त विभाग)- पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढविण्यास मान्यता. अंमलबजावणीचा कालावधी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार. (जलसंपदा विभाग)- हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस साठवण तलाव प्रकल्पासाठी ९० कोटी ६१ लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यता. (जलसंपदा विभाग)- हिंगोली जिल्ह्यातील सुकळी साठवण तलाव (ता. सेनगाव) प्रकल्पासाठी १२४ कोटी ३६ लाख रुपयांच्या तरतुदीस मंजुरी

## आ. संदीप क्षीरसागर...

खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कुशल कार्य प्रणालीला प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख सन्माननीय अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील शेकडो महत्वपूर्ण पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला आहे. काल, दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ९. ०० वाजताच्या दरम्यान मुंबईतील मुक्तागिरी निवासस्थानी महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक अत्यंत विश्वासू व खंदे समर्थक म्हणून सर्वश्रुत असणारे सतीष जगन्नाथ शेळके, कैलास रमेश घल्लाळ (सरपंच), अजिज चाँद शेख (उपसरपंच), प्रफुल्ल हनुमंतराव पाठक, किरण शिवाजीराव शिंदे, रोहित श्रीराम जाधव, सुरेश शिवाजीराव खुरणे (उपसरपंच), गणेश आनंदराव भरनाळे, महेश भगवान कदम, संदीप फल्हाद नवले यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा लक्षवेधी प्रवेश सोहळा पार पडला. या महत्वपूर्ण प्रवेश सोहळ्याने बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट हादरला असून आगामी निवडणुकांत राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली आहेत व शिवसेनाची पकड आणखी मजबूत झाली आहे. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्यासह जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर उपस्थित होते.

## भाजपचं मुख्यमंत्रीपदाचं...

पदावर दावा करण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजपचे बिहारच्या मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न भंगण्याची शक्यता आहे.
नितीश कुमार पुन्हा मुख्यमंत्री- एनडीएचे सरकार आल्यास नितीश कुमार पुन्हा मुख्यमंत्री बनण्याची शक्यता आहे. कारण अनेकदा ज्या पक्षाच्या जास्त जागा येतात त्या पक्षाचा मुख्यमंत्री होतो. त्यामुळे जर जेडीयूने जास्त जागा जिंकल्यास पुन्हा एकदा बिहारचे नेतृत्व नितीश कुमार यांच्याकडे

◆ पान 9 वरून पुढे...

जाऊ शकते. यामुळे बिहारमध्ये मुख्यमंत्रीपद मिळवण्यासाठी भाजपला वाट पहावी लागण्याची शक्यता आहे.

## दिल्ली बॉम्बस्फोटानंतर...

९ जणांचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी झाले आहेत. या स्फोटानंतर राजधानीतील सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे सतर्क झाल्या आहेत. तर दिल्लीतील बॉम्बस्फोटानंतर संपूर्ण महाराष्ट्रात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई, पुणे आणि नागपूरसह इतर प्रमुख शहरांमध्ये सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक करण्यात आली आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सारख्या गर्दीच्या ठिकाणी आणि नागपूरमधील संवेदनशील असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाभोवती पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. नागपूरच्या संघ मुख्यालय परिसराला तिहेरी स्वरुपाच्या सुरक्षा घेरा घालण्यात आल्याचे पाहायला मिळत आहे. तर मुंबईतही रेल्वे स्थानकांवर डॉग स्कॉडच्या मदतीने तपासणी केली जात आहे आणि संशयित व्यक्तींची चौकशी होत आहे. दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. शहरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय, रेशीमबाग येथील स्मृती भवन, दीक्षा भूमी आणि प्रमुख रेल्वे स्थानकांवर सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक करण्यात आली आहे. संघ मुख्यालयाला सीआयएसएफ , एसआरपीएफ आणि नागपूर शहर पोलिसांचा असा तिहेरी सुरक्षा वेढा असून, परिसरातील प्रत्येक वाहनाची आणि व्यक्तीची कसून चौकशी केली जात आहे'. याव्यतिरिक्त, अजनी आणि इतवारी रेल्वे स्थानकांसह इतर संवेदनशील ठिकाणीही पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला असून, संपूर्ण शहरात दक्षता बाळगली जात आहे. श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरा च्या सुरक्षेत वाढ- अशातच, सगळ्या पुणेकरांचं श्रधस्थान असलेलं श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात देखील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. रोज हजारो भाविक या मंदिरात दर्शनाला येतात आणि जया वेळी दिल्लीसारख्या स्फोटाच्या घटना घडतात त्यावेळी दगडूशेठ गणपती मंदिराला मोठ्या प्रमाणात सुरक्षा तैनात करण्यात येते. BDDS पथकाच्या आझाद नावाच्या कुत्र्याने आधी दगडूशेठ गणपती समोर नथमस्थक झाला आणि नंतर संपूर्ण मंदिराची पाहणी केली. संत गजानन महाराज मंदिराची सुरक्षा व्यवस्था वाढवली- दिल्ली येथे काल सायंकाळी झालेल्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील धार्मिक स्थळे व गर्दीच्या ठिकाणांना विशेष अलर्ट देण्यात आला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर देशभरात प्रसिद्ध असलेल्या शेगाव येथील संत गजानन महाराज मंदिर परिसरातही पोलिसांनी विशेष खबरदारी घेत छावणीचा स्वरूप दिलेला आहे प्रत्येक भाविकाची मेटल डिटेक्टर च्या माध्यमातून तपासणी करून आज सोडण्यात येत आहे तर मंदिर परिसरात शीघ्रकृतिदल व पोलिसांचा मोठा पहारा लावण्यात आलेला आहे या ठिकाणी सशस्त्र पोलीसही नेमण्यात आले आहे. मुंबईतील उडचढ वर कडक बंदोबस्त,

◆ पान 9 वरून पुढे...

RPF जवानांकडून प्रवाशांची कसून तपासणी
'दिल्लीच्या घटनेनंतर आता मुंबई पोलीस असू देत किंवा महाराष्ट्रमध्ये सर्व ठिकाणी आता पोलीस हे सतर्क झाले आहेत'. संपूर्ण रेल्वे स्थानकाची कसून तपासणी केली जात असून, विशेषतः दुसऱ्या राज्यांमध्ये जाणाऱ्या मेल-एक्स्प्रेसच्या प्रवाशांवर लक्ष केंद्रित केले आहे. RPF चे जवान मेटल डिटेक्टर आणि श्वान पथकाच्या मदतीने प्रवाशांच्या बॅगांची तपासणी करत आहेत, जेणेकरून कोणताही अनुचित प्रकार टाळता येईल. मुंबईतील महत्त्वाच्या आणि गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली असून, नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी नेत्या...

दाखल झाल्यांतर त्या चांगल्याच संतापल्या होत्या. रुपाली पाटील यांनी पोलीस स्थानकात जाऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्यासोबत अरेरावी करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच त्या पोलिसांवरही संतापल्या होत्या. या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.
नेमकं प्रकरण काय? पुणे राष्ट्रवादी कांग्रेसचे नेत्या रुपाली पाटील यांची बहीण आणि इतर तीन जणावर खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माधवी खंडाळकर या महिलेने रुपाली पाटील यांच्यावर पोस्ट लिहिली होती. याचा राग मनात धरून रुपाली पाटील यांच्या बहिणीने मला मारहाण केल्याचा व्हिडीओ माधवी खंडाळकर हिने व्हायरल केला होता. मात्र नंतर तिने आमच्यात गैरसमज झाले आणि त्यातून हे झाल्याच म्हटल होत. मात्र काल माधवी खंडाळकर हिने खडक पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावर रुपाली पाटील यांच्या बहिणीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्या नंतर रुपाली पाटील यांच्या बहिणीने पण तक्रार दाखल केली आणि माधवी खंडाळकर हिच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत. या सगळ्यांमध्ये चाकणकर असल्याचा आरोप रुपाली पाटील यांनी केला आहे.

## भावा विरोधात ...

विश्लेषकांकडून विचारला जात आहे. संदीप क्षीरसागर यांच्या विरोधात वडील रवींद्र क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर, चुलते जयदत्त क्षीरसागर यांनी एकत्रित मोट बांधत योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी आपली ताकद विधानसभेत उभी केली. या एकाकी लढाईत संदीप क्षीरसागर यांनी विजय अक्षरशः खेचून आणला. बीडची राजकारणाची समीकरणं आता पूर्वीची राहिली नाहीत हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केलं. त्या उलट योगेश क्षीरसागर यांनी कुटुंबीयाची मोट बांधत भक्कम पाठिंबा या निवडणुकीत मिळवला. हेमंत क्षीरसागर यांनी देखील जी काही थोडीफार ताकद होती ती पणाला लावण्याचे काम केलं. मात्र तरीही बदललेल्या राजकीय स्थित्यंतरामुळे पराभव वाट्याला आला गेला.सामाजिक विजनवासातून हेमंत क्षीरसागर यांनी थेट आता नगरपालिका निवडणुकीत भाजपमधून मैदानात उतरायचा

◆ पान 9 वरून पुढे...

निर्णय घेतला. बीडमध्ये भाजपची परिस्थिती फारशी चांगली नसल्याचे चित्र सध्यातरी पाहायला मिळत आहे. योगेश क्षीरसागर असो की संदीप क्षीरसागर या दोघांना जितका इच्छुक उमेदवारांचा प्रतिसाद मिळत आहे. तशी स्थिती भाजपची नसल्याचं सांगितलं जात आहे. अशा परिस्थितीत मागील पंचवार्षिक काळात बीड नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष राहिलेले हेमंत क्षीरसागर पुन्हा भाजपमधून कितपत उभारी घेऊ शकतील याबाबत प्रश्नचिन्ह उभे केले जात आहेत. हेमंत क्षीरसागर यांच्या भाजप प्रवेशाने मात्र गेल्या चाळीस वर्षापासून नगरपालिकेत एक हाती सत्ताधीश राहिलेल्या क्षीरसागर घराण्यामध्ये पडलेली ही फुट संदीप क्षीरसागरंपेक्षा योगेश क्षीरसागर यांना नुकसानकारक ठरेल असा अंदाज राजकीय जाणकारांनी व्यक्त केला आहे.

## सर्वसामान्य लोकांची...

चर्चा करण्यासाठी असतानाही, या बैठकीला अक्षरशः सभेचे स्वरूप आले. या बैठकीत गर्दीने उच्चांक गाठल्याचे दिसून आले. जनतेच्या आशा-अपेक्षांचा वेध घेत, विकास आणि पारदर्शकतेचा नवा अध्याय लिहिण्याची तयारी सर्वांना सोबत घेऊन केली आहे असे आ.क्षीरसागर यांनी सांगितले. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## १५ जणांनाही...

आणि पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी तातडीने ताराबाई पार परिसरात पोहोचले. काँग्रेस आमदार सतेज पाटील यांच्या अजिंक्यतारा कार्यालयाच्या पिछाडीस असलेल्या हॉटेल वूडलँड या परिसरात सुरुवातीला बिबट्या असल्याचे निष्पन्न झालं. यावेळी बिबट्याने एका पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला केला.. कसाबसा पोलीस कर्मचारी कृष्णा पाटील यांनी हातातील काठीने आपली सुटका करून घेतली. पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला केल्यानंतर हा बिबट्या महावितरण कार्यालयाच्या पाठीमागे असणाऱ्या चेंबर मध्ये लपून बसला. त्यानंतर खऱ्या अर्थाने सुरू झाली बिबट्याला पकडण्याची मोहीम. बिबट्या चेंबरमध्ये आसरा घेतला असल्यामुळे वनविभागाने आधी या सर्व परिसराला जाळी लावून घेतली. त्यानंतर ट्रँग्यूलर गन घेऊन सेफ्टी जॅकेट परिधान केलेले पाच कर्मचारी हळूहळू चेंबरच्या दिशेपर्यंत पोहोचले. आणि त्यानंतर चेंबर वर जाळी टाकली. बिबट्याला याचा अंदाज येताच त्याने धूम ठोकण्याचा प्रयत्न केला, पण जीवाची परवा न करता वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी बिबट्यावर झडप मारली. त्यानंतर तातडीने बिबट्याला ट्रॅक्युलर गन शूट करण्यात आलं. यानंतर देखील बिबट्या पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण बिबट्या बेशुद्ध होईपर्यंत कर्मचाऱ्यांनी आपली पकड ढिल्ली सोडली नाही.त्यानंतर अवघ्या काही काळात बिबट्या बेशुद्ध झाला आणि अखेर मोहीम फत्ते झाली

◆ पान ४ वरून पुढे...

## राष्ट्रवादी काँग्रेस...

तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा नेटाने प्रयत्न करीन व महाराष्ट्राची संस्कृती असलेली शिव शाहू फुले आंबेडकर मौलाना आझाद यांचे धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचारांची बांधील राहून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मा. ना.अजित दादा पवार साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीन अशी ग्वाही दिली व मला अल्पसंख्यांक विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष अँड नाझेर काझी यांचे व माझ्या नावाची शिफारस करणाऱ्या सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करतो व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व पक्ष संघटन वाढवण्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थे च्या निवडणुकीत यश मिळेल या साठी प्रयत्नाची पराकाष्टा करीन अशी हमी दिली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय येथे शेख निजाम यांचा वरील मान्यवरांकडून सत्कार करण्यात आला.

## परळीत खा. ....

विकास व्हावा, असे वाटत आहे, अशी मंडळी मुंडेंपासून दूर होवू लागली असून यात माजी नगराध्यक्ष दिपक देशमूख, त्यांच्या पत्नी संध्याताई देशमूख यांनी खा.बजरंग सोनवणे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आज मुंबईत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, आ.जितेंद्र आव्हाड, पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेश सरचिटणीस राजाभाऊ फड यांची यांची उपस्थिती होती. दिपक देशमूख हे परळीच्या राजकारणात अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत. त्यांनी परळीचे नगराध्यक्षपदही भुषविलेले आहे. त्यांच्या कार्यकाळात परळी शहरात मोठ्या प्रमाणात दर्जेदार विकास कामेही झालेली आहेत. दरम्यान, प्रवेशानंतर माध्यमांशी बोलताना दिपक देशमूख म्हणाले, येथील आमदार सत्ताधाऱ्यांचे काम पाहिले तर कोणतेही विकास काम त्यांनी केलं नाही. जे काही कामे केली त्यात भ्रष्टाचार करण्यात आला. आम्ही वारंवार ही बाब वरिष्ठांच्या कानावर घातल्यावरही यावर कुठला मार्ग निघाला नाही. परळीतील अर्धवट विकास कामे यामुळे मी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सहा महिन्यापासून मी या कामाला लागलो होतो. मी लोकसभेला पंकजा मुंडे यांचे काम केले त्यानंतर विधानसभेला धनंजय मुंडे यांचे काम केले, असेही ते म्हणाले.

◆ पान ४ वरून पुढे...

## गेवराई शहरासह...

सर्वांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये स्वागत केले. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करावे. येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूकीत विरोधकांना त्यांची जागा दाखवावी. विरोधासाठी विरोध आणि विकास कामात अडथळा निर्माण करणे हे विरोधकांचे काम आहे. त्यांच्या भुलथापांना बळी पडू नका. विधानसभा निवडणुकीत आ. विजयसिंह पंडित यांना आशिर्वाद दिला तसा आता येणाऱ्या काळात शिवछत्र परिवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून सर्व कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. भेंड येथे झालेल्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे, शरद कबले, योगेश गाडे, रवी शिर्के, आकाश जाधव, अशोक शिंदे, विठ्ठल गिरी बाबा रडे, शेखर हुंबे, शिवाजी शिंदे आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेना कार्यालय...

केले होते. यामुळे काल सकाळी १०.०० वाजल्यापासूनच शेकडो इच्छुक उमेदवार आपल्या कार्य अहवालासह शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात उपस्थित होते. सर्व इच्छुक उमेदवारांची मुलाखत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली तर मुलाखतीदरम्यान बीड शहरातील शिवसेनेचे मुख्य पदाधिकारी व निरीक्षक देखील उपस्थित होते. नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणाऱ्या प्रक्रिया आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वाहतूक, बाजारव्यवस्था व नागरिक कल्याण यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यावश्यक असल्याचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी नमूद केले. लवकरच शिवसेना आपले उमेदवार जाहीर करून पूर्ण ताकदीने नगर पालिका निवडणूक लढवेल आणि बीड नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवेल असा

◆ पान ४ वरून पुढे...

ठाम विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केला.

## सामूहिक विवाह....

अनाथायी खर्च होऊ नये व सामूहिक विवाह सोहळ्याचा प्रोत्साहन मिळावे यासाठी स्वयंसेवी संस्थांना असे सामूहिक विवाह सोहळे आयोजित करण्याचे तसेच अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील व्यक्तींना अशा विवाह सोहळ्यात विवाह करण्याचे आवाहन करण्यात येत आहे सदर बाबतीत अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नगर रोड बीड या कार्यालयात संपर्क साधावा ही विनंती अशा प्रकारचे आव्हान देखील सहाय्यक आयुक्त समाज कल्याण जिल्हा बीड विभागाच्या मार्फत सर्व सर्वांना करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय छात्र...

समाजामध्ये राष्ट्रीय भावना वृद्धिंगत होण्यासाठी सर्वांनी कार्य करावे असे सांगितले. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ यांबरोबरच एनसीसी कॅडेट्स, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मानले.

## तलवाडा जि. प. गटात...

मतदारांनी आपल्या भावना माझ्याशी शेअर करतांना सांगीतले की या वेळेस नवीन चेह-याला भैय्या साहेबांनी संधी ध्यावी आम्ही त्या संधीचे स्वागत करुन भरघोस मताने मा. भैय्या साहेबाचा ऊमेदवार निवडुन अणु. आस्या प्रतिक्रिया मतदारांनी दिल्याने मी माझे मनोगत त्यांच्याशी शेअर केले. मतदारांनी लागलीच दुजोरा देत मला निवडनुक लडवण्यासाठी प्रोत्साहित केल्याने आमचे नेते आदरणीय भैय्या साहेबांनी जनभावना लक्षात घेऊन मला तलवाडा जिल्हा परिषद गटातुन ऊमेदवारी ध्यावी मतदारांनी मला शब्द दिला आसल्याने मी प्रतीस्पर्ध्याला नक्किच पच्छाडल्या शिवाय राहणार नाही. फक्त मला माझे नेते मा. भैय्या साहेबांनी ऊमेदवारी द्यावी आसे मनोगत सेवा निवृत्त बांधकाम कार्यकारी अभियंता कल्याणाव हात्ते यांनी व्येक्त केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## फार्मर आयडी असूनही...

सांगितले की , बीड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत . प्रत्येक मंडळ विभागात ' फार्मर आयडी तपासणी केंद्र ' सुरू करण्यात आले असून , महा ई - सेवा केंद्रांद्वारे दुरुस्तीची सुविधा उपलब्ध आहे . शेतकऱ्यांनी आधार लिंक , खाते नाव आणि आयडी क्रमांक अचूक तपासणे अत्यंत आवश्यक आहे . तहसीलदार शेळके यांनी पुढे सांगितले की , महा ई - सेवा केंद्रातील ऑपरेटर , ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्या मदतीने ही प्रक्रिया सोपी पद्धतीने पूर्ण केली जाऊ शकते . फार्मर आयडी योग्य नसल्यास नुकसानभरपाई रोखली जाते ; त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने ही जबाबदारी स्वतः घेऊन सुधारणा करणे अत्यावश्यक आहे , असे त्यांनी नमूद केले . फार्मर आयडी ही फक्त ओळख नव्हे , तर शासनाच्या सर्व कृषी योजनांचे डिजिटल दार आहे . शेतकऱ्यांच्या अचूक डेटामुळे शासनाला योग्य लाभ पोहोचवणे शक्य होते . मात्र ग्रामीण भागात अजूनही तांत्रिक अडचणी , जागरूकतेचा अभाव आणि माहितीचा अभाव ही समस्या आहे . प्रशासन , ग्रामसेवक आणि ई - सेवा केंद्र चालक यांनी गावागावात मोहीम राबवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केल्यास , बीड जिल्हा राज्यात डिजिटल लाभ पूर्ण जिल्हा म्हणून ओळखला जाऊ शकतो . त्यामुळे जिल्हा प्रशासनाने पुढील आठवड्याभरात सर्व शेतकऱ्यांचे खाते तपासून शून्य प्रलंबित प्रकरण हे उद्दिष्ट साध्य करण्याचे ठरवले आहे .

## बदामराव पंडित....

जाधव यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. ग्रामपंचायत सदस्य एकनाथ राठोड, संतोष राठोड, नवनाथ पवार, ज्ञानेश्वर राठोड, कृष्णा राठोड, बळीराम राठोड, आणि राहुल चव्हाण या सर्वांनी यासाठी निर्णय भूमिका घेतली. पाचेगाव सर्कलचे माजी जिल्हा परिषद सदस्य शामराव राठोड यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले. यावेळी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सौ गिरिका भाभी पंडित आणि भाजपा युवा नेते माजी सभापती युधाजित पंडित यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती भीष्माचार्य दाभाडे, सरपंच कैलास माने, आप्पासाहेब चव्हाण आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural ) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## दामिनी पथकाची खोलेश्वर विद्यालयास भेट व विद्यार्थ्यांना कायदेविषयक जनजागृतीपर मार्गदर्शन



**दिंद्रूड । प्रतिनिधी**

दामिनी पथक प्रमुख झडख पल्लवी जाधव यांनी दिनांक १०/११/२०२५ रोजी खोलेश्वर विद्यालय व निवासी वसतीगृह दिंद्रूड ता. माजलगाव जि. बीड येथे भेट देवून, येथील मुलीसह विद्यार्थ्यांना बालकांचे अधिकार, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम, सेफ टच- अनसेफ टच, बालविवाह प्रतिबंध कायदा, महिलांना भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार या कायद्याबाबत तसेच धुम्रपान करू नये, मोबाईलचा अतिवापर टाळावा, अशा अनेक विषयावर मार्गदर्शन केले, तसेच मुलींनी दैनंदिन वापराच्या वस्तूने आत्मसंरक्षण कसे करायचे याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी ५०० ते ६०० विद्यार्थी हजर होते. त्यांना तत्काळ मदती साठी टोल फ्री हेल्पलाईन ११२, १०९१, १०९८ वर कॉल करणे तसेच ऑफिस कडून तयार करण्यात आलेला QR कोड वर तक्रार करणेबाबत सांगितले.त्याचप्रमाणे दामिनी पथक हे शहरात तसेच तालुक्याच्या ठिकाणी जावून शाळा, कॉलेज, वसतीगृह येथे भेट देऊन मार्गदर्शन करीत आहे.

# भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा - सुविधा तयार करा : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ज्योतिर्लिंगाना वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविक भेट देतात हे लक्षात घेवून श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचा सर्वसमावेशक विकास आराखडा असावा. मंदिर परिसरातील सुरू असलेली कामे गतीने करून प्रस्तावित कामांचे योग्य नियोजन करा. या परिसरात भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी अत्याधुनिक एकात्मिक सुरक्षाप्रणाली कार्यरत करून भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा सुविधा तयार करण्यासाठी गतीने कार्यवाही करण्याचे निर्देश सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांनी दिले. वर्षा निवासस्थान येथे पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथ व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास सादरीकरणाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला मुख्य सचिव राजेश कुमार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग व्ही. राधा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, .नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणू गोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी येणा-या सध्याची भाविकांची व भविष्यातील संख्येनुसार दर्शन रांगांचे नियोजन, यात्रा उत्सव कालावधी हे लक्षात घेऊन मंदिर परिसरात प्रतिक्षा कक्ष, पिण्याच्या पाण्याची सोय, निवासाची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, परिसर साफसफाई करणे, माहिती फलक, पर्यटक स्वागत कक्ष, पार्किंग व्यवस्थापन, आपत्कालीन यंत्रणा, तिकीट कक्ष, आरोग्य सुविधा, उपहारगृह यासह पर्यटन वाढीला चालना देणारे उपक्रम या भागात प्रामुख्याने राबवा. स्थानिक नागरिक व प्रशासनाला विचारात घेऊन येथील कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा असे निर्देश त्यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था काटेकार असावी यासाठी खबरदारी घेण्यात यावी. अत्याधुनिक यंत्रणा तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने एकात्मिक सुरक्षा प्रणाली विकसित करा, जेणेकरून तात्काळ आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत मिळेल.मंदिर व्यवस्थापनासाठी काटेकोर नियम असणे गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धन व रोजगार निर्मितीसाठी पर्यटन विभागानेही येथील प्रस्तावित कामे गतीने करावीत. आज सादर झालेल्या आराखड्यांना उच्चस्तरीय समितीकडून मंजूरीनंतर निधी मिळेल. पुरातत्व विभागाकडून घेण्यात येणा-या मंजुरीसाठी केंद्र शासनाच्या अधिका-यांसोबत एक वेगळी बैठक आयोजित करावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

## खालसा स्पोर्ट अकॅडमीच्या दोन तेजस्वी खेळाडू आकांक्षा सांगळे व नंदिनी देशमाने यांचा अभिमानास्पद पराक्रम

**बीड । प्रतिनिधी**

गर्ल पॉवरची झलक दाखवत पाटोद्याच्या दोन कराटेपटूंनी जिल्हास्तरावर जोरदार कामगिरी सादर केली आहे. बीड येथे दिनांक ८ व ९ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या जिल्हास्तर शालेय कराटे क्रीडा स्पर्धेत खालसा स्पोर्ट अकॅडमी, पाटोदा येथील आकांक्षा बाळू सांगळे व नंदिनी दत्ता देशमाने या दोन्ही कराटेपटूंनी आपल्या १७ वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक पटकावले आहे.यशाच्या या पंचने दोघींनाही जालना येथे



होणाऱ्या विभागीय स्तरावरील कराटे स्पर्धेसाठी निवड मिळवून दिली आहे.या स्पर्धेचे आयोजन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य, पुणे) तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने, व जिल्हा कराटे असोसिएशन बीड यांच्या तांत्रिक सहकार्याने करण्यात आले होते.या दोन्ही कराटे क्वीनना घडवणारे प्रशिक्षक म्हणजे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त कंकरसिंग टाक (सिंह सर), तर त्यांना सतत प्रोत्साहन देणाऱ्या खालसा स्पोर्ट अकॅडमीच्या मार्गदर्शिका माता देविंदर कौर खालसा यांचे योगदान लक्षणीय आहे.पाटोदा शहरातून आणि पालक वर्गाकडून या दोन्ही कराटेपटूंवर अभिमानाचा वर्षाव होत असून, विभागीय स्तरावर त्या अजून उज्ज्वल यश मिळवतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## स्किल सोबत विल काळाची गरज

### गुरुकृपा कॉलेज ऑफ फार्मसी येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सीईटी सेलने फार्मसीची सुरू केलेली प्रवेशाची अंतिम प्रक्रिया संपत आलेली आहे या पार्श्वभूमीवर गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, माजलगाव या महाविद्यालयात डी फार्मसी आणि बी फार्मसी प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंडेक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. कॉलेजचा पहिल्या दिवशीच आयोजित अकॅडमिक इंडक्शन प्रोग्राम हा वर्षभर चालणाऱ्या



सिलॅबस आणि कॉलेजचे एक्सट्रा अॅक्टिव्हिटीस याबद्दल माहिती देण्यासाठी असतो. गुरुकृपा महाविद्यालय आयोजित या प्रोग्राम मध्ये बायनेट फार्मा कंपनीचे डायरेक्टर माननीय श्री. बालाजी सांगळे यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना फार्मसी मधील विविध करिअर संधीची माहिती सांगितली. कॉलेजच्या पहिल्या दिवशीच तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन मिळणे हे दुर्मीळच पहायला मिळते. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांत उत्सास वाढला. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन सानिया पठाण व साक्षी तोर या विद्यार्निनीने केले तर प्रास्ताविक प्राचार्य अमित बिंदू यांनी केले. या कार्यक्रमात प्रा. गणेश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना कॉलेज स्टाफची ओळख करून दिली.

## पत्रकार राजरतन डोंगरे यांना अर्वाच्य भाषेत बाचाबाची करणाऱ्या पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचे निलंबन करून बदली करा

### पत्रकार सुरक्षा समितीसह विविध संघटनेच्या वतीने पोलीस उपभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**माजलगाव । प्रतिनिधी**

पत्रकार राजरतन डोंगरे यांना अर्वाच्य भाषेत बाचाबाची करणाऱ्या पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचे निलंबन करून बदली करा. पत्रकार सुरक्षा समिती सह विविध संघटनेच्या वतीने पोलीस उपभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी देण्यात आले आहे आणि मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब महाराष्ट्र राज्य मुंबई मुख्यमंत्री कार्यालय (मंत्रालय विभाग मुंबई) यांना ई-मेल द्वारे निवेदन पाठविण्यात आले आहे

बीड जिल्ह्यातील माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी पत्रकार राजरतन डोंगरे यांना अर्वाच्य भाषेत अपमानित करण्यात आले व पोलीस स्टेशनच्या कॅबिनच्या बाहेर काढण्यात आले यामुळे त्यावेळेच्या घटनाक्रमाचा सीसी फुटेज व व्हिडिओ हे तपासून याची सखोल चौकशी करुन लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या पत्रकाराला ज्या पद्धतीने अधिकारी वागणूक देत आहे अशा अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात यावे व तात्काळ महाराष्ट्र च्या सिमा रेषेवर असलेल्या पोलीस ठाण्यात बदली करण्यात यावी. राजरतन डोंगरे यांना धमकी (३५३) जुन्या कायद्यानुसार दिली व भारतीय न्याय संहिता बि एस एन एल नविन कायद्या नुसार सुधारित १३२ गुन्हा दाखल करण्यात येईल याची धमकी दिली व तू कदापीही कुठल्याही अधिकाऱ्यांना अशा प्रकारचे प्रश्न भविष्यात विचारले नाही पाहिजे ! त्यामुळे तुला ही एक तंबी माझ्यातर्फे देईल अशी धमकी दिली यामुळे राजरतन डोंगरे यांचे मनोबलाचे खच्चीकरण झाले आहे व ते द्विवेदी अवस्थेमध्ये आहेत त्यामुळे पत्रकार सुरक्षा समिती व विविध संघटनेच्या पदाधिकारी च्या वतीने निवेदन सर्व पत्रकार यांच्यावतीने देण्यात येत आहे. या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून तात्काळ योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी बीड जिल्ह्यातील व माजलगाव तालुक्यातील सर्व पत्रकारांच्या वतीने मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदन ई-मेल द्वारे पाठविण्यात आले आहे.

## माता व बालसंगोपन इमारतीसाठी लिफ्ट व फर्निचरचा निधी देण्याची मागणी; जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालय परिसरात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत तब्बल २१ कोटी रुपये खर्चून उभारलेली १०० खाटांची माता व बालसंगोपन इमारत निधीअभावी आजही कार्यान्वित न झाल्याने धुळखात पडली आहे. लिफ्ट आणि फर्निचरच्या निधीअभावी इमारतीचा वापर सुरू होऊ शकलेला नाही.

दरम्यान, जिल्हा रुग्णालयाची जुनी इमारत अपुरी पडत असून, त्याच इमारतीत सोनोग्राफी व एक्स-रे विभाग कार्यरत आहेत. दररोज सुमारे ४०० हून अधिक रुग्ण तपासणीसाठी येतात, मात्र



व्हरांड्यात केवळ १५ ते २० रुग्णांसाठीच बसण्याची सोय असल्याने गर्भवती महिलांना ताटकळत उभे राहावे लागते. आयपीडी विभागातही गर्दी वाढल्याने उपचारात अडचणी निर्माण होत आहेत.

या पार्श्वभूमीवर डॉ. गणेश ढवळे (मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य), शेख युनुस च-हाटकर आणि शेख मुबीन यांनी आज (दि.१०) जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्यामार्फत पालकमंत्री अजितदादा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि जिल्हा प्रशासनाला निवेदन दिले. या निवेदनात नियोजन समितीकडून लिफ्ट व फर्निचरसाठी तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

१०० खाटांच्या माता व बालसंगोपन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून लिफ्ट व फर्निचरच्या उर्वरित कामांसाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर केला आहे. इमारतीमध्ये एकूण ४ लिफ्ट असून त्यापैकी ३ लिफ्टचे काम पूर्ण झाले आहे. निधी मिळताच उर्वरित लिफ्ट व फर्निचरचे काम पूर्ण करून इमारत कार्यान्वित केली जाईल, असे डॉ. संजय राऊत यांनी सांगितले.

## विराज शामसुंदर शेकडे याची थाळी फेक राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२५-२६ मध्ये झालेल्या स्पर्धेत मैदानी खेळात थाळीफेक या खेळ प्रकारांमध्ये विराज ने विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धे साठी राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा महाराष्ट्र शासन आयोजित जिल्हा क्रीडा कार्यालय रत्नागिरी तालुका चिपळूण क्रीडा संकुल डेरवण येथे निवड झाली आहे. आता तो छत्रपती संभाजी नगर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. मार्गदर्शक व जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर साहेब तसेच थलेटिकचे



अविनाश पाटील साहेब, तालुका क्रीडा समन्वयक वाहेद सर तसेच वेळोवेळी मार्गदर्शन करणारे श्री पठाण सर, श्री बालाजी नागरगोजे सर या सर्वांनी विराज चे अभिनंदन करून पुढील क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. चि.विराजचे सर्व स्तरातून सर्वत्र कौतुक होत

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त महाराष्ट्रभर भारतमातेच्या स्तुतीचा गौरव दिन साजरा केला जात आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ३५८ तालुक्यामधील ५००० पेक्षा



अधिक देश प्रेमींसोबत सार्धशताब्दी महोत्सवानिमित्त वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आले. याउपक्रमामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन केले. यावेळी श्री. निमेश चिद्रवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी उपस्थितांना वंदे मातरम गीताविषयी सविस्तरपणे माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी उपक्रमामध्ये सहभागी सर्वांचे अभिनंदन करून कौतुक केले. याप्रसंगी दैनिक लोकमतचे पत्रकार श्री. अनिल महाजन, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, प्राचार्य विजय शिनगारे, धारूर आयटीआय येथील श्री. शेख सर, धारूर शहरातील सर्व शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांबरोबरच डॉ. नितीन कुंभार, प्रा. एस. के. काळे, महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, धारूर शहरातील पत्रकार, माजी विद्यार्थी व नागरिकांचा सहभाग मोठ्या संख्येने होता.


### वारस प्रमाणपत्रा बदल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ९०२/२०२५**
**अलका कांतीलाल सौंदरमल विरूध्द – निरंक**

ज्याअर्थी मयत नामे कांतीलाल गणपत सौंदरमल हे दिनांक १४.०७.२०२३ रोजी गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार- १. अलका कांतीलाल सौंदरमल वय ४८ वर्षे धंदा -घरकाम, रा. भिमनगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड, २. विशाल कांतीलाल सौंदरमल, वय ३८ वर्षे धंदा नौकरी, भिमनगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड, ३. विकास कांतीलाल सौंदरमल, वय ३६ वर्षे धंदा नौकरी रा. भिमनगर, गेवराई.

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणं असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असंही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर भरत नाम कांतीलाल गणपत सौंदरमल रा. भिमनगर, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख: १६.१२.२०२५
(मार्फत- ॲड. एस. बी. भंडारी)
(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बदल जाहीर घोषणा

**मा.माणिकराव आर सातव साहेब ७ वे सह-दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १५५६/२०२५**
**आशा व इतर वि. निरंक**

ज्याअर्थी मयत नामे देवईबाई भ्र. हरी निर्मळ रा. नेकनूर, ता.जि.बीड ह्या दिनांक ०४-१०- २०२४ रोजी मौजे नेकनूर, ता. जि. बीड येथे मयत झाल्या आहेत.

अर्जदार:- १) आशा भ्र. दशरथ निर्मळ, वय ५५ वर्षे, धंदा-घरकाम. रा.नेकनूर. ता. जि. बीड, २) अनंता पि. दशरथ निर्मळ. वय-३६ वर्षे, धंदा-मजुरी, रा.वरील प्रमाणे, ३) परमेश्वर पि. दशरथ निर्मळ, वय-३४ वर्षे, धंदा- मजुरी. रा. वरील प्रमाणे. ४) माया पि. दशरथ निर्मळ, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे

शासकीय निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदर मयताचे कायदेशीर वारस नव्हेत. असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्का लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे देवईबाई भ्र.हरी निर्मळ, रा. नेकनूर, ता.जि. बीड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३/११/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारिख- १२-१२-२०२५

(ॲड.एस.बी.शिंदे यांच्या मार्फत)

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १६८०/२०२५**

अर्जदार : १. शोभा कचरु मत्रे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. लक्ष्मी निवास, धांडे गल्ली, तेरवी लाईन, बीड, ता.जि.बीड, २.अमृता मुकुंद भोसले, वय - ३१ वर्षे, धंदा - घरकाम, रा. धांडे गल्ली, बीड, ता.जि.बीड, ३. सुरेखा गणेश मत्रे, वय - ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. धांडे गल्ली, तेरवी लाईन, बीड, ता.जि.बीड, ४. ओम गणेश मत्रे, वय - १९ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, ५.हर्षदा गणेश मत्रे, वय - २० वर्षे, धंदा - शिक्षण, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे कचरु विश्वनाथ मत्रे हे दिनांक २८/१२/२०१७ रोजी बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क ३ ही मयताची सुन म्हणजे मयताचा मयत मुलगा गणेश कचरु मत्रे याची पत्नी आहे. अर्जदार क ४ व ५ ही अर्जदार क ३ व मयत गणेश यांची अपत्ये आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १०/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीख:- २०/१२/२०२५.
(मार्फत विधिज्ञ:- ॲड महादेव धांडे)

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १६२१/२०२५**
**मुक्ताबाई वि. निरंक**

ज्यापेक्षा आश्रुबा जिजाबा सांगळे हे दिनांक २०/०३/२००९ रोजी पोखरी, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार- १.मुक्ताबाई भ्र. आश्रुबा सांगळे, वय ८२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. पोखरी, पो. लिंबागणेश, ता. जि. बीड, २.बाबा पि. आश्रुबा सांगळे, वय ६० वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. शहादेव पि. आश्रुबा सांगळे, वय ५७ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे, ४. लक्ष्मण पि. आश्रुबा सांगळे, वय ५१ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार नं. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई, वडिल यापुर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन् असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे आश्रुबा जिजाबा सांगळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख २१/११/२०२५ ही आहे.

आज दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.(ॲड. डी. डी. मस्के यांच्यामार्फत) आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक विभाग बीड जिल्हाध्यक्षपदी शेख निजाम



**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री माननीय नामदार अजित दादा पवार साहेब, राष्ट्रीय कार्याध्यक्ष श्री प्रफुल्ल भाई पटेल साहेब, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनीलजी तटकरे साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. जलालुद्दीन सय्यद साहेब त्यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार व शिव, शाहू, फुले, आंबेडकर, मौलाना आझाद यांचे धर्मनिरपेक्ष विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष अँड. नाझेर काझी साहेब यांनी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे साहेब, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब, माजी आमदार संजय दौंड साहेब, आ. विजयसिंह पंडित साहेब, प्रदेश प्रवक्ता भागवत तावरे साहेब, बीड जिल्हाध्यक्ष अँड. राजेश्वर आबा चव्हाण साहेब, विधानसभा प्रमुख डॉ. योगेश क्षीरसागर, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, महादेव अण्णा धांडे, अजिंक्य आनेराव, प्रज्ञाताई खोसरे, शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ चे संचालक शेख तय्यबभाई, गटनेते फारूक पटेल, नगरसेवक विनोद मुळूक, प्रा. गोपाळ धांडे, बीड यांच्या शिफारसी वरून बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे धडाडीचे कार्यकर्ते शेख निजाम यांची बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केलेली आहे नियुक्ती झाल्यानंतर शेख निजाम यांनी मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार ▶ उर्वरित पान २ वर

# परळीत खा. सोनवणेंचा मास्टरस्ट्रोक

## मुंडेंना धक्का देत माजी नगराध्यक्षांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**● मुंबईत शरद पवार यांच्या उपस्थितीत तुतारी घेतली हाती**

**परळी । प्रतिनिधी**

परळीत मुंडेंच्या एकाधिकारशाहीला सूरूंग लावण्यासाठी खा. बजरंग सोनवणे यांनी नवनवीन डाव टाकायला सुरूवात केली असून आ. मुंडे यांचे सहकारी तथा परळीचे माजी नगराध्यक्ष दिपक देशमूख आणि पत्नी संध्याताई देशमूख यांनी दि. १० नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत (शरद पवार गट) प्रवेश केला. सदरील प्रवेश पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. परळीत आ. धनंजय मुंडे यांच्या राजकारणाला शह



**● दिपक देशमूख हे परळीचा विकास व्हावा, यासाठी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात आलेले आहेत. परळीत कुणाची किती ताकद आहे, ते आता कळणार असून परळीचा गड आम्ही राखू. परळीत सर्व कार्यकर्त्यांना एकत्रित बसवून परळी नगर पालिकेचा उमेदवार ठरवला जाणार आहे. –खा. बजरंग सोनवणे, बीड.**

देण्यासाठी खा. बजरंग सोनवणे यांनी सुरूवात केलेली आहे. नगरपालिका निवडणूकीत राष्ट्रवादी शरद पवार गट ताकदीने उतरणार असल्याने शहरातील मात्तबर मंडळी मुंडेंना सोडून पर्यायाची चाचपणी करत आहे. ज्यांना शहराचा ▶ उर्वरित पान २ वर

# गेवराई शहरासह तालुक्यात राष्ट्रवादीत ईनकमिंग जोरात

## अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत भेंड येथील शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

**गेवराई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार करत गेवराई शहरासह तालुक्यातील भाजपा–सेनेचे शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादीत प्रवेश करत असुन गेवराई नगर पालिका निवडणुकीत होत असलेल्या या प्रवेशामुळे बदामराव पंडित – लक्ष्मण पवार गटात खळबळ उडाली आहे. गेवराई शहरासह तालुक्यात राष्ट्रवादीत ईनकमिंग जोरात सुरु झाल्यामुळे



राष्ट्रवादीचे पारडे जड झाले आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे भेंड बु. येथील भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते तथा सरपंच रविंद्र जंगले, उपसरपंच विवेक वाव्हळ यांच्यासह अभिमान कोळपे, बाबा खरात, शंकर पवार, उदय जंगले, लखन जंगले, कृष्णा जंगले, सुरज जंगले, प्रदीप जंगले, युवराज जंगले, माऊली कोळपे, बाबासाहेब जंगले, वशिष्ठ जंगले, बापूराव वाव्हळ, अशोक वाव्हळ, नेमाजी गायकवाड, कल्याण वाव्हळ, राजू शिंदे, गोपाळ कोळपे, बालाजी जंगले, मांजरम जंगले, बालाजी गायकवाड, लक्ष्मण सोळुंके, बळीराम बडेकर, सखाराम कोळपे, देवराव जंगले, अच्युत कोळपे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भेंड बु. येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी ▶ उर्वरित पान २ वर

# शिवसेना कार्यालय हाऊसफुल; शेकडो इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती संपन्न

## बीड नगर पालिका निवडणूक पूर्ण ताकदीने लढवून शिवसेनेचा भगवा फडकवू : अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आगामी नगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेना पक्षाकडून उमेदवारीसाठी अर्ज दाखल केलेल्या शेकडो इच्छुक उमेदवारांचे मुलाखत सत्र काल सोमवारी दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यलय, बीड येथे पार पडले असून या



मुलाखत सत्रादरम्यान जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचे शिवसेना मध्यवर्ती कार्यलय हाऊसफूल झाल्याचे पाहायला मिळाले. प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख चेहरा पुढे आणण्यावर भर दिला जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी स्पष्ट ▶ उर्वरित पान २ वर

# सामूहिक विवाह सोहळ्यास 'प्रोत्साहन'चा लाभ घ्या: भोगले

**बीड । प्रतिनिधी**

सामूहिक विवाह सोहळ्यास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २००३ ४ या आर्थिक वर्षापासून कन्यादान योजना लागू करण्यात आलेली आहे सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हास्तरावर सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड या कार्यालयामार्फत करण्यात येते सदर योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्था मार्फत आयोजित केलेल्या सामूहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह केलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दापत्यास प्रति दांपत्य रुपये २००००/ हजार इतके

**● सामूहिक विवाह सोहळ्यास प्रोत्साहन मिळावे या हेतूने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २००३–४ या आर्थिक वर्षापासून कन्यादान योजना लागू करण्यात आली आहे या कन्यादान योजनेचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हान मा सहाय्यक आयुक्त समाज कल्याण श्री प्रदीप भोगले सर यांच्यामार्फत करण्यात आले आहे**

**● सहाय्यक आयुक्त मा प्रदीप भोगले सर यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत सध्या बीड जिल्ह्यातील सर्व लाभार्थ्यांमधून व विद्यार्थ्यांमधून व विद्यार्थिनी यांच्या मधून या प्रदीप जी भोगले साहेबांच्या प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत सर्वत्र लाभार्थ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.**

अर्थ सहाय्य देण्यात येते तसेच असा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या नोंदणी करत स्वयंसेवी संस्थेस प्रति दांपत्य रुपये ४०००/इतके अनुदान देण्यात येते सामूहिक विवाह सोहळ्यात किमान दहा दांपत्याचे विवाह होणे अपेक्षित आहे व्यक्तिगत पातळीवर केल्या जाणाऱ्या विवाह सोहळ्या मध्ये ▶ उर्वरित पान २ वर

# राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून आपले करिअर घडवा: सुभेदार मेजर आशाराम एस. बी.

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील एनसीसी युनिटच्या वतीने आयोजित कार्यक्रमामाध्ये ५१ महाराष्ट्र बटालियन छत्रपती संभाजीनगरचे सुभेदार मेजर आशाराम एस. बी. यांनी एनसीसीमध्ये निवड झालेल्या कॅडेट्सनी मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे आवाहन केले तसेच एनसीसीच्या माध्यमातून आपले करिअर घडवावे असे सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमास बीएचएम एस. एस. राव यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारंभातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी एनसीसी



कॅडेट्सला संबोधित करताना सांगितले की, आपणास देशसेवा व राष्ट्रभक्ती करण्याचे भाग्य मिळाले आहे. ▶ उर्वरित पान २ वर

# तलवाडा जि. प. गटात अमरसिंह पंडीताच्या नेतृत्वात, चेहरा नवा बदल हवा चर्चेला आले ऊधान

## सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग कल्याणराव हात्ते प्रबळ दावेदार

**तलवाडा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विविध नगर परिषद नगर पालिकाच्या होऊ घातलेल्या निवडनुकिच्या तदनंतर बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडनुकिचे लागलीच बिगुल वाजणार आसल्याने गेवराई तालुक्यातील तलवाडा जिल्हा परिषद गटातुन निवडनुक लडवण्यास आणेक नावे चर्चेत येत आसतांनाच तलवाडा गटात मात्र चेहरा नवा बदल हवा या चर्चेला ऊधान आल्याचे ऐकावयास मिळत असुन या आणुषंगाने माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या निकटवर्ती मधुन सेवा निवृत्त बांधकाम कार्यकारी



अभियंता कल्याणाव हात्ते यांच्या नावाची जोमाने चर्चा होऊ लागल्याचे निदर्शनास येत असुन होत आसलेल्या चर्चेला अनुसरुण आमच्या प्रतिनिधिने सेवा निवृत्त बांधकाम कार्यकारी अभियंता कल्याणराव हात्ते यांच्याशी विचारपुस केली आसता त्यांनी सांगितले की मी पूर्वी पासूनच आदरणीय शिवाजीराव दादा पंडीत यांचा पाईक राहिलेलो असुन गाव पातळी ते तालुका स्तरावर मी सातत्याने आमचे नेते माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या प्रतेक निवडनुकित खंदा समर्थक म्हणून सक्रिय राहिलेलो आहे. शासकीय सेवेत आसल्याने मी जरी समोरा समोर स्टेज गाजवतांना दिसलो नसलो तरी सक्रिय मात्र नक्किच होतो. त्यामुळे मी तलवाडा गटात फिरून जिल्हा परिषद निवडनुकि संदर्भात आढावा घेतला आसता बहुतांश ▶ उर्वरित पान २ वर

# फार्मर आयडी असूनही नुकसानभरपाई मिळाली नाही ?

## शेतकऱ्यांनी तातडीने दुरुस्ती करून घ्या : तहसीलदार चंद्रकांत शेळके

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी शासनाच्या सूचनेनुसार आपली फार्मर आयडी तयार केला असला तरी, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई त्यांच्या खात्यात जमा झालेली नाही , अशी बाब समोर आली आहे . बीड जिल्ह्यातही ही समस्या मोठ्या प्रमाणावर आढळत आहे . नुकसानभरपाईचा निधी शासनाने मंजूर केला असला , तरी फार्मर आयडीमधील तांत्रिक चुका, आधार आणि बँक लिंकिंगमधील



विसंगती यामुळे रक्कम अडकली आहे . जिल्हा प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार , बीड जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे बँक खाते आधारशी लिंक नसणे , नावात स्पेलिंगची चूक असणे किंवा एकाच शेतकऱ्याच्या नावावर दोन वेगवेगळ्या फार्मर आयडी तयार झालेल्या असणे या कारणांमुळे नुकसानभरपाईची रक्कम अडकली आहे . काही प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांचे खाते निष्क्रिय असल्याने व्यवहार पूर्ण होऊ शकले नाहीत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी संयुक्त आवाहन करून सांगितले की , शेतकऱ्यांनी आपल्या फार्मर आयडीमधील नाव , आधार क्रमांक , बँक खाते माहिती तपासून त्वरित दुरुस्ती करावी . शासनाकडून मदत मंजूर असून , तांत्रिक चुका राहिल्यास निधी खात्यात जमा होणार नाही . या संदर्भात प्रशासनाने सर्व तालुका स्तरावर कृषी व महसूल अधिकाऱ्यांना ‘ तपासणी आणि सुधारणा मोहिम ’ राबविण्याचे निर्देश दिले आहेत . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी माहिती देताना ▶ उर्वरित पान २ वर

# बदामराव पंडित यांचा भाजप प्रवेश होताच वसंत नगर तांडा ग्रामपंचायतवर भाजपचे वर्चस्व

## सरपंचपदी सविता जाधव उपसरपंच भारत जाधव

**गेवराई । प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करताच तालुक्यातील पाचेगाव जिल्हा परिषद सर्कल मध्ये असलेल्या वसंत नगर तांडा ग्रामपंचायतवर भाजपचे वर्चस्व निर्माण झाले असून, रिक्त झालेल्या सरपंच पदी सौ सविताताई बाळू जाधव



तर उपसरपंच पदी भारत अंकुश जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पाचेगाव जिल्हा परिषद सर्कल मधील वसंत नगर तांडा या ग्रामपंचायतीचे सरपंच एकनाथ राठोड यांनी राजीनामा दिल्यानंतर दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी सरपंच आणि उपसरपंच यांची निवड करण्यात आली. यात भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या मार्गदर्शनाने सरपंच पदी भाजपाच्या सौ सविताताई बाळू जाधव यांची तर उपसरपंच पदी भाजपचे भारत अंकुशराव ▶ उर्वरित पान २ वर

# सीड्स बॉल ही आधुनिक संकल्पना कृषी क्षेत्रात वरदान ठरणार: जयंत रानडे

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण शिबिर महाविद्यालयात संपन्न झाले . विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने सीड्स बॉल या आधुनिक संकल्पनेचे प्रात्यक्षिक करण्यात आले. या प्रशिक्षणासाठी पर्यावरण



प्रेमी ,विद्यार्थी –शिक्षक प्राध्यापक उपस्थित होते . डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व स्वा. सावरकर महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी एक दिवसीय पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रम पूर्ण झाला. या पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रमास उद्घाटक म्हणून जयंत रानडे स्थापत्य अभियंता सांगली यांच्या हस्ते झाले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर उपस्थित होते आणि मार्गदर्शक म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. हेमंत वैद्य यांनी पर्यावरण संरक्षण हीच ईश्वर सेवा आहे असे मानून प्रत्येकाने पर्यावरण संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. या उपक्रमाचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. सुहास मोराळे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी केले . याप्रसंगी व्यासपीठावर स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे तसेच संस्थेच्या विद्यासभेचे उपाध्यक्ष उमेश जगताप उपस्थित होते. या पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ व हरित परिसर समिती यांच्या वतीने सीड्स बॉल संकल्पनेचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले यात बदाम, सिताफळ, रामफळ, चिंच, एरंडी, लिंब अशा उपयुक्त विविध झाडांच्या बिया चिखलांच्या गोळ्यांमध्ये ठेवून त्याचे बॉल कसे बनवले जातात व या माध्यमातून आपण पर्यावरण संरक्षण कसे करू शकतो याचे प्रात्यक्षिक विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. गंगाधर उषमवार व भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. अशोक डोके यांनी विद्यार्थी व मान्यवरांना करून दाखवले. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. डॉ. जोगेंद्र गायकवाड, प्रा. पंडित शेंडगे, प्रा. डॉ. संतोष शिंदे, श्री सचिन चौरे व विविध सहकारी बंधूंचे सहकार्य लाभले.